Ph.D./M.Phil Unit
Inward No.: 2707
Date : 20/6/19

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in Mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/ 8175 दि. १९/०६/२०१९

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
आवक /क्र. 3679
दिनांक - 19/06/2019
जावक दिनांक - 20/6/19 (PG)
विभाग -

19 JUN 2019

**तात्काळ अत्यंत महत्वाचे**

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी त्यांचे प्रोफाईल तात्काळ अद्ययावत करणे बाबत.**

राज्यशासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी पोर्टलवरुन अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदरहू पोर्टलमध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांचे नांव व अभ्यासक्रम याबाबतची माहिती महाडीबीटी पोर्टलवर अद्ययावत असणे आवश्यक आहे.

तरी याबाबत कळविण्यात येते की, सद्यस्थितीत महाडीबीटी पोर्टलवर महाविद्यालयांची मागील वर्षाची उपलब्ध माहिती (महाविद्यालयाचे नाव, पत्ता, अभ्यासक्रम इ.) दर्शविण्यात आलेली आहे. सदर माहितीमध्ये काही तफावत असल्यास किंवा महाविद्यालयांमध्ये काही नवीन अभ्यासक्रम सुरु झालेला असल्यास अशा महाविद्यालयांना त्यांच्या अभ्यासक्रमांची माहिती अद्ययावत करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करावयाच्या अभ्यासक्रमास शासनाची मान्यता आवश्यक असून, त्याबाबतची कागदपत्रे डीबीटी पोर्टलवर अपलोड करणे आवश्यक आहे. महाडीबीटी पोर्टलवर महाविद्यालयांना त्यांचे प्राचार्य लॉगीनमधून सदरची माहिती अद्ययावत करावयाची आहे.

सदरच्या सूचना आपल्या अधिनस्त असलेल्या अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव तसेच शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्या तात्काळ निदर्शनास आणून देण्यात यावेत. तसेच ज्या महाविद्यालयांची महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी झालेली नाही, अशा महाविद्यालयांकडून विहीत नमुन्यामध्ये माहिती घेऊन त्यांची नावे महाडीबीटी पोर्टलवर समाविष्ट करणेबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :-
१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

DY. R. (P.G.)

19/6